Literacy for a Billion

Movie: Vajwa re vajwa
Year: 1993

Song: Rahu kashi tujhyavina priya
Lyricist:

राहू कशी तुझ्याविना प्रिया
प्रीती तुझी वसे मनात या
येना आता प्रिया...
हाय दुरावा मिलन राती
शब्द सुरांना सोडून जाती
तुजविण आता जगणे कसले
ओठावरती गाणे रूसले
नयनी विरही भाव दाटती
हाय दुरावा मिलन राती
शब्द सुरांना सोडून जाती

आठवते ती भेट तुझी
त्या शपथा ती प्रीत तुझी
आठवते ती भेट तुझी
त्या शपथा ती प्रीत तुझी
अजूनी कलिका नव्हती फुलली

मन सुमने ही सुकूनी गेली
तुजविण दिन हे शून्य भासती
हाय दुरावा मिलन राती
शब्द सुरांना सोडून जाती

दूरता अशी सखे मी साहू कशी
लोचनांची जाण तू भाषा अशी
का हासती पाने फुले आम्हां अशी
स्पर्शाविना का रात ही सरली अशी
अवचित येईल रात्र चांदणी
ही विरहाची सरतील गाणी
भ्रमर फुले रमतील संगती

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*